# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची सन २०१७–१८ करीता ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत...**

उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७–१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून न करता त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती योजना राबविताना येणाऱ्या शंकांचे निराकरण करण्यासाठी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी कार्यशाळा आयोजित केलेली आहे. महाविद्यालयातील शिष्यवृत्ती संबंधीत कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी/प्रतिनीधी यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे. जिल्हानिहाय कार्यशाळेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | स्थळ | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | नाशिक व दादरा नगर हवेली येथील महाविद्यालये | के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक | २३/०२/२०१८ दुपारी ०३.०० वाजता |
| २ | अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालये | न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर | २४/०२/२०१८ दुपारी ०३.०० वाजता |
| ३ | पुणे शहर व पुणे जिल्हयातील महाविद्यालये | मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर , पुणे | २६/०२/२०१८ दुपारी ०३.०० वाजता |

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, शासनाने आयोजित केलेल्या वरील कार्यशाळेस न चुकता उपस्थित रहावे.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/५६४ }
दिनांक : २२/०२/२०१८ }

प्रत:
मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.
मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/ईबीसी ऑफलाईन कार्यवाही/२०१७-१८/ 375 दिनांक : २२.०२.२०१८

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**विषय : - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची सन २०१७-१८ करीता ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. ७.१०.२०१७,
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दि. १४.०२.२०१८,
३. मा. संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी ऑफलाईन कार्यवाही/१८८४ दि. १५.२.२०१८.
४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. शिससं/उशि/पुवि/ईबीसी ऑफलाईन कार्यवाही/२०१७-१८/३५२ दिनांक : १७.०२.२०१८.

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानूसार उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून न करता त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे करण्यात येत आहे. तथापि संबंधित योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करुन घेण्यासाठी संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकातील अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत संदर्भिय परिपत्रक क्र. ४ अन्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

परंतु सदर शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत वारंवार या कार्यालयाकडे दूरध्वनीद्वारे विचारणा होत आहे. तरी याबाबतच्या सर्व शंकांचे निराकरण करण्यासाठी या कार्यालयाने खालील ठिकाणी कार्यशाळेचे आयेजन केलेले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालयाचे नाव | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | नाशिक व दादरा नगर हवेली येथील महाविद्यालये | के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक | २३.०२.२०१८ दुपारी ३.०० वाजता |
| २ | अहमदनगर जिल्ह्यातील महाविद्यालये | न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर | २४.०२.२०१८ दुपारी ३.०० वाजता |
| ३ | पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील महाविद्यालये | मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे | २६.०२.२०१८ दुपारी ३.०० वाजता |

**तरी सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांनी या कार्यशाळेस वर नमुद केलेल्या दिनांक व वेळेस उपरोक्त महाविद्यालयामध्ये सर्व संबंधित कर्मचाऱ्यासह न चुकता उपस्थित रहावे.**

**(डॉ. विजय नारखेडे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रति - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीस्तव सादर